मंगळवार दि.३ सप्टेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३६७
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता
बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत
संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# राज्यातील प्रत्येक माणूस सुखी,समृद्ध,आनंदी होऊ दे:मुख्यमंत्री यांची भीमाशंकराकडे प्रार्थना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिरात ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. राज्यात सर्वत्र चांगला पाऊस आहे, शेतात उदंड पीक येऊ दे; राज्यातील बळीराजा सुखी व समृद्ध होऊ दे. सर्व विभागातील प्रत्येक माणूस सुखी, समृद्ध, आनंदी होऊ दे, अशी प्रार्थना भीमाशंकराकडे केल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले.

पुजेनंतर मुख्यमंत्री शिंदे यांचा भीमाशंकर देवस्थान ट्रस्टच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, म्हाडाच्या पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील, पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अपर जिल्हाधिकारी अजय मोरे, माजी आमदार शरद सोनवणे आदी उपस्थित होते.

भीमाशंकराचे दर्शन घेतल्यानंतर मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, राज्यातून येणाऱ्या भाविकांना येथे दर्शनाचे भाग्य लाभते. मी दरवर्षाप्रमाणे यावर्षीही श्रावणी सोमवारी दर्शनासाठी आलो आहे. दर्शनानंतर अभिषेक झाल्यानंतर मनाला समाधान वाटते. ही वास्तू प्राचीन असून येथून सकारात्मक उर्जा मिळते. यावेळी देवाला साकडे घालताना राज्यातील संपूर्ण जनता भीमाशंकराच्या आशीर्वादाने सुखी, समृद्ध होऊ दे, आयुष्यात चांगले दिवस येऊ दे, त्यांच्या जीवनात परिवर्तन येऊ दे; सुखाचे, समाधानाचे आणि आनंदाचे दिवस त्यांच्या कुटुंबात येऊ दे, अशी प्रार्थना केल्याचे शिंदे म्हणाले.

महाराष्ट्र प्रगत राज्य असून आपण राज्यात अनेक कल्याणकारी योजना सुरू केल्या आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना, मुलींना मोफत व्यावसायिक उच्च शिक्षण, ज्येष्ठ नागरिकांसाठी योजना आदी कल्याणकारी योजना राबवत आहोत. एकीकडे कल्याणकारी योजना आणि एकीकडे विकास अशी सांगड घालण्याचा आम्ही प्रयत्न करतोय. असेच काम चालू ठेवण्यासाठी ताकद, प्रेरणा आणि ऊर्जा द्यावी, अशी प्रार्थना केल्याचे शिंदे म्हणाले.



# स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी ठरलेल्या विदर्भ अकॅडमीच्या विद्यार्थ्यांची विजयी मिरवणूक व भव्य सत्कार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार सरोवर । विनायक कुटे**

लोणार शहरातील नावलौकिक असणारी विदर्भ अकॅडमी, ज्यामध्ये शेकडो विद्यार्थी प्रशिक्षण घेऊन नोकरीला लागतात. या वर्षी सुद्धा विदर्भ अकॅडमी मध्ये शिक्षण घेणारे २८ जवानांचे स्पर्धा परीक्षा मार्फत महाराष्ट्र पोलीस व स्पर्धा परीक्षेमध्ये सिलेक्शन झाले. या सर्व विद्यार्थ्यांचे सत्कार करण्यात आले. या २८ पैकी दोन मुले जुळे भाऊ असून लोणार शहरातील सकाळ प्रतिनिधी राधेश्याम सोनुने यांचे सुपुत्र आहेत.


अमित राधेश्याम सोनुने हा प्रयोग शाळा वैज्ञानिक सहाय्यक यवतमाळ येथे तर सुमित राधेशाम सोनुने हा वाशीम ज़िल्हा परिषद मध्ये पाणी पुरवठा विभागात लागला.विदर्भ अकॅडमी आझाद नगर लोणार वरून या मुलांची विजय मिरवणूक काढण्यात आली यावेळी शेकडो विद्यार्थी व विध्यार्थींनी रॅली मध्ये सहभागी झाले होते. इतर विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळेल हा या रॅलीचा मुख्य उददेश होता असे विदर्भ अकॅडमी संचालक निसार शेख यांनी बोलतांना सांगितले. सत्कार समारंभात प्रमुख मार्गदर्शक म्हणून लोणार तहेसील चे तहसीलदार भूषण पाटील हे होते. तहसीलदार भूषण पाटील यांनी विद्यार्थ्यांना स्वतः कसा घडलो हे सांगून सखोल मार्गदर्शन केले व मुलांमुलींना प्रोत्साहित केले. या नंतर शिवसेना जिल्हा प्रमुख प्रा. बळीराम मापारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विदर्भ अकॅडमी मधून नोकरीला नाही लागले तरी आपण सर्वात मोठी संपत्ती म्हणजे शरीर संपत्ती या अकॅडमी मधून घेऊन जाणार आहात आणि मुली संस्कार घेऊन जाणार ज्याची आज प्रामुख्याने गरज आहे, याची मी शाश्वती देतो असे प्रा. बळीराम मापारी यांनी मुलांमुलींना सांगितले.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थे चे सचिव प्रकाश भाऊ मापारी हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिती चे माजी सभापती तथा न. पा. सदस्य संतोष मापारी, हाजी मसूद, शिवसेना शहर अध्यक्ष पांडुरंग सरकटे, इम्रान खान मित्र मंडळाचे अध्यक्ष इम्रान खान, अंजुमन शाळेचे हेड मास्तर अन्नू सर,साहेबराव पाटोळे, हाजी रिजवान जड्डा, पत्रकार राहुल सरदार व संतोष पुंड हे हजर होते. कार्यक्रमाची प्रस्तावना प्रशिक्षक रवी साबळे यांनी मांडली व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.नबील शेख यांनी केले.

# अतिवृष्टी विष्णूपुरी धरणाचे १० गेट उघडले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

नांदेड जिल्ह्यात व विविध प्रकल्पाच्या कॅचमेंट एरियामध्ये सुरू असलेल्या पावसामुळे विष्णुपुरी धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याचा प्रवाह वाढला आहे. दिग्रस बंधाऱ्याचे ४ दारे उघडली आहे.याशिवाय सिध्देश्वर धरणातूनही मोठया प्रमाणात पाणी सोडले जात आहे. पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहितीनुसार नांदेड येथील विष्णुपुरी धरणाचे दहा दरवाजे उघडण्यात आले आहे. पाण्याचा प्रवाह असाच कायम राहिल्यास आणखी काही गेट उघडले जाऊ शकतात. नदीपात्राशेजारी राहणाऱ्या नागरिकांनी सावध राहावे, पूर परिस्थितीतील आवश्यक काळजी घ्यावी, असे आवाहन नांदेड जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.



# अतिवृष्टीचे पंचनामे तात्काळ करा; पालक मंत्री गिरीश महाजन यांच्या प्रशासनास सूचना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

नांदेड जिल्ह्यामध्ये गेल्या ४८ तासात जिल्ह्यात सर्व दूर अतिवृष्टी झाली आहे. या अतिवृष्टीमुळे शेती, पशुधन, घरे व अन्य मालमत्तेच्या झालेल्या नुकसानाकडे शासनाचे लक्ष असून पाऊस थांबताच पंचनामे करण्यात यावे, असे आदेश राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी आज दिले आहे.

नांदेड मधील अतिवृष्टीच्या संदर्भात आज पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त व जिल्हा पोलीस अधीक्षकांशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. जिल्ह्यातील सद्यस्थितीचा आढावा घेतला. जिल्हयातील ९३ मंडळापैकी ६५ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे उभ्या पिकाचे नुकसान झाले आहे. तसेच प्राथमिक माहितीनुसार अनेक ठिकाणी घरांची पडझड झाली असून पशुधनाचे देखील नुकसान झाले आहे. सध्या पाऊस



सुरू आहे.मात्र पाऊस थांबल्यानंतर प्रशासनाने तातडीने पंचनामे सुरू करावे असे त्यांनी निर्देश दिले आहे.

महानगरपालिका आयुक्तांशी देखील त्यांनी शहरातील नुकसानाचा आढावा घेण्याचे निर्देश दिले असून शासनामार्फत नुकसानीची तातडीची जी मदत आहे ती लवकरात लवकर नागरिकांना मिळेल याबाबतचे नियोजन करण्याचे निर्देशित केले आहे.नांदेड शहरात काही भागात अतिवृष्टी झाली आहे. त्यामुळे नदीकाठावरील घरांमध्ये पाणी घुसले आहे. अशा घरातील रहिवाशांना देय असलेली योग्य ती मदत शासनामार्फत तात्काळ उपलब्ध करून दिली जावी, असेही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यातील प्रकल्पांचा देखील त्यांनी आढावा आज घेतला. पाटबंधारे विभागाने पाण्याचा निचरा करताना आवश्यक ती खबरदारी घ्यावी. तसेच नदीकाठच्या गावांना सतर्क करावे. गोदावरी पात्राच्या वरील भागात देखील आपण संपर्क साधला असून तेलंगाना राज्यासोबतही वाररूम मधून यंत्रणा संपर्क साधून आहे. शक्यतो पुराचा फटका नागरिकांना बसणार नाही या पद्धतीने पाण्याची नियोजन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अॅड.विठ्ठल तनपुरे यांची अमरावती चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**



लोणार -येथील वकील विठ्ठल तनपुरे यांची महाराष्ट्र शासनाच्या सहकार पणन व वस्त्रउधोग विभागाच्या मार्फत अमरावती विभागा करिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधीनियमान्वे सहकार आयुक्त पुणे यांच्या आदेशानुसार चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

वकील तनपुरे यांच्या कडे अमरावती, वाशीम, बुलडाणा,अकोला व यवतमाळ या पाच जिल्हाचे अधिकार क्षेत्र असणार आहे.तसेच निबंधक सहकारी संस्था यांचा दर्जा असणार आहे.या नियुक्तीमुळे त्याचें अभिनंदन होत आहे.

## चारोळी

**थोडी तरी उसंत घे**
**सारखं धावणं बरं नव्ह**
**शोधत जा स्वतःला कधीतरी**
**तुझ्या कष्टाचं चीज व्हावं.**

रंजना सानप
मायणी (सातारा)

# सेवा निवृत्त मेजर अनिल वांगणे यांचा वांगदरीत सन्मान सोहळा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क


**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा तालुक्यातील वांगदरी येथील रहिवासी असलेले आणि शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेले मेजर अनिल धनाजी वांगणे यांनी भारत देशासाठी आपल्या आयुष्यातील २२ वर्ष आर्मीत सेवा दिली आहे. त्यानंतर ते सेवानिवृत्त झाले त्याबद्दल वांगदरी गावातील नागरिकांनी त्यांच्या सेवानिवृत्ती बद्दल जल्लोषात सन्मान सोहळा आयोजित केला होता. त्या निमित्त ह.भ.प.लाटे महाराज यांचे प्रवचन आयोजन करण्यात आले होते. मेजर अनिल वांगणे यांनी बावीस वर्षे देश सेवा केल्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे स्वागत केले .



सन्मान सोहळ्याला उत्तर देताना मेजर अनिल वांगणे म्हणाले की आता पर्यंत बाविस वर्षे देश सेवा केली तसे आता आपण गावाची ही सेवा नक्कीच करणार आहोत या वेळी श्रीगोंदा मध्ये चालू असलेल्या शहीद स्मारका च्या कामासाठी मेजर अनिल वांगणे यांनी धनादेश दिला.सदर कार्यक्रमाला नागवडे कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तिमत्व विठ्ठल आप्पा नागवडे, नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे, , संदीप नागवडे मेजर चांगदेव पाचपुते, मेजर खामकर, पत्रकार बाळासाहेब काकडे, पत्रकार माऊली येवले, पत्रकार नितीन रोही, महादेवजी देरेकर (ग्रा.पं.सदस्य) सूत्रसंचालन बापूराव कांबळे यांनी केले तर आभार संजय वांगणे यांनी मानले सदर कार्यक्रमाला वांगदरीचे सर्व आजी-माजी ग्रामपंचायत सदस्यां सह तालुक्यातील आजी-माजी सैनिक व नातेवाईक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शारदा माध्यमिक विद्यालय अंतर्गत मतदारांना जनजागृती रॅली



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

शाळकरी मुलांना मतदानाचे महत्त्व कळावे यासाठी भोकरदन तालुक्यातील वरूड बुद्रुक ता. २३ येथील शारदा माध्यमिक विद्यालय शाळेमध्ये मतदार जनजागृती अभियान राबविण्यात आले. यानिमित्त शाळेच्या परिसरात रॅली काढण्यात आली. या रॅलीला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यातून मतदान करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांनी केले. शालेय शिक्षणात व्यवहारज्ञानाचे धडे मिळणे हा एक शिक्षणाचा भाग आहे. विधानसभेचे निवडणुकीचे पडघम वाजू लागले. यावेळी विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व कळावे या उदात्त विचारातून व पालकांनीही मतदानास चांगला प्रतिसाद द्यावा याकरिता शारदा माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापक के. बी. गाढे आणि श्री.पी.व्ही.लहाणे,राजेंद्र ढाकरे,रमेश भोपळे अशोक जाधव यांच्या माध्यमातून मतदार जनजागृती अभियान रॅली काढण्यात आली. मतदानाच्या दिवशी सुट्टी म्हणून बाहेर फिरायला न जाता, घरी न थांबून मतदान करावे, अशी भावनिक साद रॅलीच्या माध्यामातून घालण्यात आली. विविध घोषणा देऊन मतदानाचा जागर करण्यात आला. मतदानविषयक जनजागृती करण्यासाठी सर्वप्रथम विद्यार्थ्यांमार्फत आई, बाबा, ताई, दादा यांना पत्र देऊन मतदानाचे आवाहन करण्यात आले. या वेगळ्या उपक्रमाचे गावांतील नागरिकांनी जल्लोषात स्वागत केले.

# भाजपा तालुका उपाध्यक्षपदी शामराव देशमुख यांची निवड

## हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांचे हस्ते नियुक्ती प्रमाणपत्र देण्यात आले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**

भारतीय जनता पार्टी तालुका उपाध्यक्षपदी शामराव देशमुख यांची निवड करण्यात आली असून या निवडीमध्ये हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या हस्ते त्यांना नियुक्ती प्रमाणपत्र देण्यात आले यावेळी एडवोकेट के के शिंदे, भाजपा युवा नेते शिवाजीराव मुटकुळे, सेनगाव तालुका अध्यक्ष हिम्मतराव राठोड, माणिकराव लोंढे, विठ्ठलराव घोगरे, संतोषराव टेकाळे, संतोष खोडके रामभाऊ आईतवर आदी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या हस्ते नियुक्ती प्रमाणपत्र देऊन त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या,



# जयदत्त सुरेश धस मित्र मंडळ आयोजित भव्य दहीहंडी उत्सवास तौबा गर्दीने आष्टीकरांचे लक्ष वेधले

## दहीहंडी महोत्सवाच्या नेत्रदीपक सोहळ्याने डोळ्याचे पारणे फिटले





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

### आष्टीकरांचे दहीहंडी महोत्सवातील तौबा गर्दीने लक्ष वेधले..

पुणे,मुंबई या धर्तीवर मोठमोठ्या शहराप्रमाणे आष्टी शहरात प्रथमच भव्यदहीहंडी महोत्सव आपल्या ग्रामीण भागात पार पडला आणि या उत्सवास तरुणाईने तौबा गर्दी करत लक्ष वेधले.अष्टीकरांनी समाधान व्यक्त करत युवानेते जयदत्त सुरेश धस मित्र मंडळाच्या अतिशय शिस्तबद्ध नियोजनाबदल उपस्थितांनी आभार मानले.

हाथी घोडा पालकी,जय कन्हैया लाल की.या जय घोषाने डीजेच्या तालावर थिरकलेली तरुणाई तर सात थरांची अंगावर शहारे आणणारा दहीहंडी पथकांचा तो जल्लोष आणि हा नेत्र दीपक सोहळा पाहण्यासाठी उसळलेल्या जनसागराने आष्टी करांचे पारणे फेडत तौबा गर्दीने लक्ष वेधले.

युवा नेते जयदत्त सुरेश धस मित्र मंडळ आयोजित भव्य दहीहंडी महोत्सव २०२४ या कार्यक्रमास माजीमंत्री सुरेश धस यांची प्रमुख उपस्थिती होती.तर श्रीकृष्ण पूजा करून भव्य दहिहंडी कार्यक्रमांचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास धस,भाजपा तालुकाध्यक्ष ड.साहेबराव म्हस्के,युवा नेते सागर धस,युवा नेते तथा सरपंच राधेश्याम धस,प.स.माजी उपसभापती अजिनाथ सानप,माजी प.स.सदस्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे यशवंत खंडागळे,एन. टी.गर्जे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. इंदापूर येथील व्यंकटेश पथकाच्या गोपाळांनी ही दहीहंडी फोडण्याचा मान पटकावित स्पर्धेत बाजी मारली.यावेळी विजेत्या संघास रोख स्वरूपात बक्षीस आणि सन्मानचिन्ह मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.आष्टी शहरात श्रीकृष्ण जन्माष्टमीचा सोहळा धार्मिक कार्यक्रमांनी विविध ठिकाणी उत्साहात पार पडला.यावर्षी प्रथमच आष्टी शहरात पंचायत समिती प्रांगणात बुधवार (दि.२८) रोजी जयदत्त धस मिंत्रमंडळाच्या वतीने दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.दुपारी ४ वाजेपासूनच या महोत्सवाचा उत्साह पाहायला मिळाला.या दहिहंडी निमित्त प्रमुख आकर्षक बॉलीवूड अभिनेत्री सई मांजरेकर मराठी तारका मानसी नाईक श्री स्वामी समर्थ मालिकेतील भूमिका साकारणारी मोहिनी अवसरे प्रसिद्ध नृत्यांगना झेबा शेख यांची तर माजीमंत्री सुरेश धस यांची प्रमुख उपस्थिती होती.लेजर लाईट शो,डि.जे.च्या तालावर थिरकणारी तरुणाई आणि आकर्षक विद्युत रोषणाई व फटाक्यांची आतषबाजी याने या सोहळ्याची दिमाखात सुरुवात झाली.या महोत्सवात दोन संघांनी सहभाग घेत आपापली कामगिरी यावेळी चांगल्या पद्धतीने करून दाखविली.प्रथमतः इंदापूर येथील व्यंकटेश गोविंदा पथक व भिगवण येथील शिवरूद्र गोविंदा पथकाने सलामी दिली.यानंतर इंदापूर येथील व्यंकटेश गोविंदा पथकाने ७ थर लावून ही दहीहंडी फोडली आणि विजयाचे मानकरी ठरले. याप्रसंगी माजी शिक्षण सभापती उध्दव दरेकर,जि.प.सदस्य माऊली जरांगे,सभापती बद्रीनाथ जगताप,ज्येष्ठ नेते भाऊसाहेब भवर,गणेश शिंदे,नगराध्यक्ष जिया बेग,पाटोदा नगराध्यक्ष राजू जाधव,माजी सभापती अशोक इथापे, महेश हंबर्डे,अमोल शिंदे,युवा नेते अभिजीत शेंडगे सरपंच उद्धव पवार,सरपंच अजित घुले,महेश खकाळ,युवराज बर्डे, माजी सरपंच राम धुमाळ,यांच्यासह आदि मान्यवर उपस्थित होते.नियोजनबद्ध आणि शिस्तबध्द आयोजन केलेल्या जयदत्त धस मित्र मंडळाच्या दहीहंडी महोत्सवाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

---

# उदगीरच्या इतिहासात पहिल्यांदाच राष्ट्रपतीच्या दौऱ्यानिमित्त संपूर्ण उदगीर नगरी स्वागतासाठी सज्ज

## क्रीडामंत्री संजय बनसोडे; जिल्हाधिकारी यांच्याकडून आढावा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उदगीर । सुनिल बस्वराज हावा

भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या प्रथम आगमनासाठी ऐतिहासिक उदगीर नगरी सज्ज झाली आहे. चार तारखेला होणाऱ्या बुद्ध विहार उद्घाटन व महिलांच्या आनंद मेळाव्याची तयारी पूर्ण झाली असून उदयगिरी महाविद्यालयाच्या मैदानावर भव्य सभा मंडप उभा राहिला आहे. बुद्ध विहार लोकार्पणासाठी सज्ज असून आज पूर्ण परिस्थितीचा आढावा राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे व जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी घेतला.

राष्ट्रपती महोदयांचा महाराष्ट्राच्या दौऱ्याची आजपासून सुरुवात झाली आहे. बुद्धविहाराचे लोकार्पण व महिलांचा आनंद मेळावा नियोजित वेळेवर व्हावा, यासाठी प्रशासन ताकदीने कामाला लागले आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लभार्थी महिलांचा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत राज्यातील पहिलाच कार्यक्रम या ठिकाणी होत आहे.

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे, त्यांना पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध करून रोजगार निर्मितीसाठी चालना देणे,महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर बनवणे, यासाठी विविध शासकीय योजनांची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनांचा दुसरा टप्पा सुरू झाला आहे.

महाराष्ट्रात प्रथमतः या कार्यक्रमाला राष्ट्रपती उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या स्वागतासाठी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री गिरीश



महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्यासह विविध मान्यवर उदगीरमध्ये पोहचत आहेत.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी आज या आयोजनाच्या शेवटच्या टप्प्यात सर्व कार्यक्रम स्थळांची पाहणी केली. राष्ट्रपतींचा हा पहिलाच उद्गित दौरा असून तो स्मरणीय बनावा यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

कार्यक्रमस्थळी विविध शासकीय विभागांच्या योजनांची माहिती देणारी दालने उभारण्यात येणार आहेत. आज या दालनाची ही पाहणी मान्यवरांनी केली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, महिला सन्मान योजना यासारख्या विविध योजनांमधील लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात राष्ट्रपतींच्या उपस्थितीत सन्मानित केले जाणार आहे. राष्ट्रपतींचा थेट संदेश ऐकण्याची संधी या कार्यक्रमात मिळणार असल्यामुळे या कार्यक्रमांची महिला जगतात प्रचंड उत्सुकता आहे.

---

# सर्जा-राजाचा सण म्हणजे 'बैलपोळा'

लोकनेता न्यूज नेटवर्क

'पोळा' हा सण श्रावण महिन्यात पिठोरी अमावस्याच्या दिवशी येतो या महिन्याची सुरुवात होताच अनेक सण उत्सवांची रेलचेल सुरू होते. पावसाचे दिवस असल्याने सृष्टीचे सौदर्यही खुलून दिसते. अशा या श्रावणात नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी या सणांनंतर सरत्या श्रावणात येतो बैल पोळ्याचा सण. संपूर्ण महाराष्ट्रात आजही मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो असा सर्जा-राजाचा सण म्हणजे 'पोळा.' शेतकरी बांधवांसाठी पोळा या सणाचे महत्व खूप आहे. या दिवशी वर्षभर शेतकऱ्याच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या बैलाची पूजा केली जाते. या सणाची शहरापासून तर गावापर्यंत धूम असते. परंतु या सणाचे विशेष आकर्षण गावांमध्येच पहावयास मिळते. वर्षभर शेतात कष्ट करून राबणाऱ्या आणि शेतकऱ्याचा खांद्याला खांदा लावून शेतीत मदत करणाऱ्या बैलाला या दिवशी पुजले जाते. त्याचे आपल्यावर अनंत उपकार आहेत.

गावातील शेतकरी सकाळपासूनच बैलपोळ्याच्या तयारीला सुरुवात करून देतो. या दिवशी सर्वात आधी शेतकरी भल्या पहाटे उठून बैलांच्या गळा आणि नाकातील दोर काढतात., या दिवशी शेतकरी आणि त्यांचे कुटुंब बैलांना धुणे, शिंगे रंगवणे, जुने दोर बदलून नवीन बांधणे, नवीन घंटा बांधणे आणि त्याचा साजशृंगार करतात. यानंतर त्यांना सजवून त्यांची पूजा केली जाते. या दिवशी बैलाच्या खांद्याला हळद व तुपाने किंवा तेलाने शेकतात. याला 'खांद शेकणे' अथवा 'खांड शेकणे' म्हणतात. बैलाच्या पाठीवर नक्षीकाम केलेली पाठीवर घालायची झुल, सर्वांगावर गेरूचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या व घुंगरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा पायात चांदीचे व करदोड्याचे तोडे घालुन त्याला खायला सुग्रास अन्नाचा नैवेद्य देतात. काही ठिकाणी बाजरी ची खिचडी सुद्धा बैलांना खाऊ घातली जाते. सायंकाळच्या वेळी गावातील सर्व लोक आपापल्या बैलांना घेऊन गावाच्या मोकळ्या चौकात जमतात. बैलपोळ्याच्या दिवस शेतकरी आणि शेतात काम करणारे बैल व इतर सर्व प्राण्यांच्या विश्रांतीचा दिवस असतोख म्हणून या दिवशी कोणतेही काम केले जात नाही. यानंतर संध्याकाळच्या वेळी घरातील महिला आपापल्या बैलाची आरती ओवाळून पूजा करतात. ढोल ताशांच्या गजरात त्यांची मिरवणूक काढली जाते. घरातील स्त्रिया स्वादिष्ट व्यंजन, पुरणपोळी व शिरा बनवतात व बैलांना पुरणपोळीचे जेवण दिले जाते. बैलाची निगा राखणाऱ्या 'बैलकरी' घरगड्यास नवीन कपडे देण्यात येतात.

ज्यांच्या घरात बैलजोडी नसते ते लोक माती व लाकडाचे बैल देखील पूजतात. बैलपोळ्याचा सण हा शेतीवर आधारित आहे व हा सण आपल्या बैलांचे व शेती तसेच शेतकऱ्यांच्या कामी येणाऱ्या प्राण्यांचे महत्त्व सांगतो. निसर्ग, मनुष्य आणि सर्व प्राणिमात्रांमध्ये देव आहे व यांची पूजा हीच देवाची पूजा होय, याची जाणीव हा सण आपणांस करवून देतो. पोळ्याच्या काळात शेतकरी शेतात बैल पाळत नाहीत आणि त्या दिवशी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात शाळांना सुट्टी असते. फार प्राचीन परंपरेतील विशेषत: पशुपालक शेतकरी वर्गाने हजारो वर्षापासून जोपासलेला पोळा हा सण. पशुपालन अवस्थे नंतर कृषक अवस्थेत आलेल्या प्राचीन मानव समूदायाचा हा सण. भूमी आणि भाकरीसाठी राबराब राबणाऱ्या श्रमसंस्कृतीचे ते प्रतीक आहे. शेतकरी व शेतमजूराचा सच्चा साथीदार म्हणजे बैल. हे तिन्ही घटकांची परस्पर पुरकता ही अन्नासह अर्थार्जन निर्मितीसाठी देशाचा मूख्य आधारस्तंभ ठरते.

आपला बैल उठून दिसावा यासाठी शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे त्याचा साजशृंगार खरेदी करतात. बैल सजवितात व पोळ्याच्या मिरवणुकीत भाग घेतात. गावाच्या सीमेजवळच्या शेतावर आंब्याच्या पानाचे एक मोठे तोरण करून बांधतात. या सणाच्या दिवशी महाराष्ट्रातल्या खेड्यांमधल्या प्रत्येक घराला आंब्याच्या पानांचे तोरण बांधले जाते व त्या जवळ गावातल्या सर्व बैलजोड्या, वाजंत्री, सनई, ढोल, ताशे वाजवत एकत्र आणल्या जातात. या वेळेस 'झडत्या' म्हणायची पद्धत आहे, त्यानंतर 'मानवाईक' ज्याला गावात मान आहे ती व्यक्ति, गावचा पाटील किंवा श्रीमंत जमीनदार तोरण तोडतो व पोळा 'फुटतो' नंतर बैल मारुतीच्या देवळात नेतात व नंतर घरी नेऊन त्यांना ओवाळतात. बैल नेणाऱ्यास 'बोजारा' देण्यात येतो, शेतकरी वर्गात हा सण महत्त्वाचा मानला गेल्याने या सणासाठी शेतकऱ्यांमध्ये विशेष उत्साह व आनंदाचे वातावरण असते.

जेव्हा कोणताच धर्म अस्तित्वात आलेला नव्हता तेव्हा पासूनच प्राचीन भारतीय मानव समुदायाने बैलपूजनाची परंपरा जोपासलेली होती हे सिंधू संस्कृतीतील उत्खननातून सिद्ध झालेले आहे. बैल हे श्रमाचे प्रतीक, त्याच्याकडून वर्षभर काम करून घेत असतांना त्याच्या या ऋणाईतून उत्तराई होण्याचा हा दिवस म्हणून पोळा सण साजरा करण्याची ही प्रथा ग्रामीण जीवनात कायम आहे. अलीकडे जरी ट्रॅक्टरद्वारे शेतीची कामे केली जात असली तरी बैलाचे महत्त्व जनमानसात आजही कमी झालेले नाही. वर्षभर शेतकऱ्यांचा सखा बणून राहणाऱ्या या बैलांच्या अपार श्रमातून देशातील तमाम मानवास रोजगार, अन्नधान्य व भोजन मिळते. परंतु या सणानिमित्त पळस या झाडांच्या फांद्या दारासमोर, गोठ्यात, शेतात ठेवण्याचीही परंपरा असल्यामुळे लाखो झाडांची तोड या दिवसावर होते. अवकाळी पाऊस, दुष्काळ या निसर्गाच्या लहरीपणातून शेतकरी व पशुपालकांचा जीव आधीच मेटाकुटीला आलेला असतांना त्यात अशा सणोत्सवाच्या निमित्ताने होणारी वृक्ष तोड योग्य नाही, पर्यावरणाचा ऱ्हास करणारी ही पळस तोड थांबायला हवी.

बैलपोळ्याचा दिवस हा शेतकऱ्यांची बैलांविषयी असलेली कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस होय आणि ही कृतज्ञता या 'पोळा' सणाच्या निमित्ताने आम्ही भारतीय सातत्याने जोपासत आलेलो आहोत. भारतीय संस्कृती मनुष्या सोबतच निसर्ग आणि प्राणीमात्रांची देखील पूजा करायला शिकवते. अलीकडे खाजगीकरण व जागतिकीकरणाच्या आडून पशुपालकांसह शेती करणारा शेतकरीवर्ग हा देशोधडीला लागलेला आहे, याची जाण शासनानी ठेवली पाहिजे. त्यातूनच त्याची दिवसें दिवस होत असलेली कुचंबना व आत्महत्या ही योग्य नाही. जर जगवणाराच जर जगला नाही तर एक दिवस स्वदेशीचा ठेंभा मिरवणाऱ्या भारतीयांना विदेशी अन्नाशिवाय जगणे कठिण होऊन बसेल हे विसरता येणार नाही.

रक्ताचे पाणी करणारा शेतकरी आत्महत्या करतो, उपाशी झोपतो तर या मंदीरात देव-धर्माचे अवडंबर माजवणारा पुजारी, पुरोहित, पंडीत चैनीने तुपाशी खातो हे वास्तव म्हणजे या देशाची शोकांतिकाच म्हणावी लागेल. या देशात गाय ही गोमाता ठरवली जाते, परंतू बैल पिता ठरत नाही. मदिरात मात्र दान-दक्षिणा ऐटण्यासाठी गोमाता नव्हे तर नंदी बैलाचीच प्रतीकृती हवी असते ही विसंगती जोपासणारेच जर संस्कृती व धर्मरक्षक बणून मानवाच्याच जीवावर उठत असेल तर आमच्या धडावर आमचेच डोके व आमचाच मेंदू असल्याशिवाय खरी संस्कृती व खरा धर्म याची सत्यता कळणार नाही. कष्टाशिवाय व्यक्तीला आणि बैलाशिवाय शेतीला पर्याय नाही, सर्वांना बैल पोळ्याच्या अनेक शुभेच्छा !

---

# शिक्षण व संस्कार जपणारे शिक्षक, प्राचार्य श्री.शेख इस्माईल सर सेवानिवृत्त

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

पाटोदा । प्रतिनिधी

रायमोह येथील श्री.जालंदर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य शेख इस्माईल सर हे वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. या निमित्त विद्यालयात सेवापुर्ती, सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री.जालंदर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रकाश बाप्पु जाधव हे होते. शिक्षण व संस्कार जपणारे प्राचार्य इस्माईल शेख सर हे ३१ वर्षाच्या सेवेनंतर सेवानिवृत्त होत असल्याने श्री.जालंदर विद्यालयाचे सर्व कर्मचारी व संस्थेच्या वतीने सेवापुर्ती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. इस्माईल शेख सर यांची जन्मभूमी व कर्मभूमी रायमोहा असल्याने या सेवापुर्ती सोहळ्यात अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मराठवाडा शिक्षक संघाचे डी.जी.तांदळे सर, कालीदास धपाटे सर, वसंतराव सानप, पोलिस निरीक्षक सुभाष सानप, माजी जि.प.सदस्य प्रा.मदन जाधव सर, प.स.उपसभापती श्री. जालिंदर काका सानप, उद्योजक सुभाष सेठ क्षीरसागर, श्री.संजयजी सानप, सुलेमान पठाण, मुराद चाचा पठाण, हाशम भाई शेख, उपसरपंच सुरेश काका जाधव, प्रभाकर नाना जाधव, प्राचार्य विष्णु मिसाळ सह आदी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे राजकुमार कदम सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना प्राचार्य श्री.शेख इस्माईल सरांच्या कार्याचा आलेख मांडला. ईस्माईल शेख सर यांच्या सेवापुर्ती प्रसंगी प्राचार्य विष्णु मिसाळ यांनी सांगितले की आम्ही याच विद्यालयाचे विद्यार्थी असल्याने शेख सर यांचे आम्हाला मार्गदर्शन लाभले आहे. तर गटशिक्षणाधिकारी जमीर सर यांनी सांगितले की सेवानिवृत्ती हा आनंदाचा तसाच दुःखाचा दिवस आहे. शेख सर यांनी सेवा काळात प्रेमाची माणसे जोडली या मुळे कार्यक्रमास इतके लोक जमले ही शेख सर यांच्या ज्ञानदानाची पोचपावती आहे. शिक्षणाच्या शिदोरी ने त्यांनी अनेक विद्यार्थी घडवण्याचे काम केले. आणी इथुन पुढे ही श्री.जालंदर विद्यालयाच्या



शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन चांगले नागरिक घडवण्याचे काम करावे असे आवाहन केले. या प्रसंगी प्रा.डॉ.जब्बार शेख नाळवंडी, प्रा.मदन सर, वसंतराव सानप, माजी प्राचार्य सातपुते सर, धपाटे, प्रा.संजय साठे, प्रा.तावरे सर यांची समायोजित भाषणे झाली. तर सत्काराला उत्तर देताना प्राचार्य इस्माईल शेख सर यांनी भावनिक होऊन सांगितले की सेवानिवृत्ती माझ्यासाठी दुःखाचा दिवस आहे. याच गावात मी घडलो वाढलो व नोकरी ही याच गावात केली. मला सर्वांचे प्रेम मिळाले, माझ्या आई, वडील, माझे भाऊ, भावजय व मित्रांचा माझ्या जडण घडणीमध्ये मोठा वाटा आहे. तर माझ्या शैक्षणिक प्रगती मध्ये माझे विद्यार्थी, सर्व शिक्षक, शिक्षिका व गुरुजनांचा मोठा वाटा आहे. विद्यार्थ्यांना आवाहन करताना सांगितले की मोबाईल पासुन दुर रहा आई, वडिल गुरुंचा आदर करा तुम्हाला जिवनात काही कमी पडणार नाही. या सेवापुर्ती सोहळ्यात माजी अध्यक्ष राजाभाऊ जाधव, प्रभाकर पाटील, डिसले आण्णा, सुधाकर जाधव, उपसरपंच सुरेश जाधव, सुलेमान पठाण, हाशम शेख, योगेश जाधव, वैभव सानप, काकासाहेब जाधव, ग्रामविकास अधिकारी कंठाळे, पत्रकार गोवर्धन जाधव, संजय सानप, प्रकाश गायकवाड, संतोष चव्हाण, ग्राम पंचायत सदस्य नाथा मंडलिक, इंजिनिअर मनियार, नागरे आण्णा, दिलीप मिसाळ सर, भगवान सानप, हाजी शरीफ तांबोळी, सखाराम जाधव, सरपंच चिंतामणी नागरगोजे, हाजी जकीर भाई, रियाज तांबोळी, वसीम तांबोळी, युसुफ तांबोळी, ओंकार जगताप सह अन्य मान्यवर, व्यापारी, रायमोह परिसरातील बारावाड्यातील नागरीक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन श्री.जालंदर विद्यालयाचे सर्व कर्मचारी, शिक्षकांनी केले होते. तर उपस्थित सर्व नागरिकांना गोड जेवण प्राचार्य इस्माईल शेख यांच्या परिवाराच्या वतीने देण्यात आले. या सेवानिवृत्ती प्रसंगी प्राचार्य इस्माईल शेख यांच्या परिवारातील सर्व महिला, नातेवाईक बहुसंख्येने उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन श्री. शेख ताजुद्दीन सर यांनी केले.

# शिवनेरी भूषण शिक्षण महर्षी स्व.विलास तांबे यांच्या ७७ व्या जयंतीनिमित्त ज्ञान विलास कृतज्ञता गौरव पुरस्काराचे वितरण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर । मयूर ढोबळे**



शिवनेरी भूषण शिक्षण महर्षी स्व.विलास तांबे यांच्या ७७ व्या जयंतीनिमित्त ज्ञान विलास कृतज्ञता गौरव पुरस्कार २०२४ कार्यक्रम सोहळा सोमवार दिनांक २/ ९/ २०२४ रोजी नंदलाल लॉन्स येथे संपन्न झाला. सदर कार्यक्रमाची सुरुवात आनंदयात्री यांच्या सुश्राव्य गीतांनी झाली या कार्यक्रमासाठी जगदविख्यात मा.डॉ. जगन्नाथ दिक्षित( ब्रँड अँबेसिडर स्थूलत्व, मधुमेह विश्व अभियान )यांचे शुभहस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा.विशाल विलासराव तांबे (अध्यक्ष, श्री.गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ ओतूर) यांनी भूषविले या कार्यक्रमाची सुरुवात स्व.विलासराव तांबे यांच्या कार्याविषयी चित्रफित दाखवण्यात आले कार्यक्रमाची सुरुवात स्व.विलास तांबे व श्री गजानन महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.विशाल तांबे यांनी केले प्रास्ताविकात सरांना संस्थेला मदत करणाऱ्या व्यक्तींचा ज्ञान विलास कृतज्ञता गौरव पुरस्कार देण्यात येतो. त्यानंतर अतिथी सत्कार करण्यात आला. डॉ.जगन्नाथ दिक्षित यांची ओळख करून दिली. पुरस्कारात माननीय विनायक कर्पे (विजय लक्ष्मी डेव्हलपर्स) मा. हाजी चांदमिया हाजी उस्मान मोमीन (आडतदार ओतूर मार्केट यार्ड )स्व.तबाजीबुवा घोलप( मरणोत्तर) यांना पुरस्कार संस्थेच्या वतीने देण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप- शाल ,स्मृतीचिन्ह, मानपत्र, बुके असे होते.पुरस्कारार्थी मनोगत स्वर्गीय घोलप यांच्या वतीने त्यांचे नातू ह. भ.प.सुधीर महाराज घोलप यांनी मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगतात सरांचे बाबांवर प्रेम होते.तसेच मा. विशाल तांबे , श्री वैभव शेठ तांबे यांचे आमच्यावर प्रेम असू द्यावे संस्थेला काही अडचण आल्यास आम्ही सदैव तयार आहोत असे आश्वासन दिले व संस्थेचे ऋण व्यक्त केले. आदरणीय विनायक कर्पे यांनी आपल्या मनोगतात लक्ष्मीची कामे सर्व करतात सरस्वतीचे काम कोण करणार असे सरांनी मला त्यावेळी सांगितले होते व ओतूर चा आर्थिक व सामाजिक विकास स्वर्गीय विलास तांबे सरांनी केला. सरांच्या मार्गदर्शनामुळे माझी वाटचाल आज चालू आहे व संस्थेचे ऋण व्यक्त केले. प्रमुख अतिथी मनोगतात मा.डॉक्टर जगन्नाथ दिक्षित यांनी ओतूरच्या नागरिकांचा अभियाना मध्ये सहभाग आहे. ज्ञान ही शक्ती आहे मधुमेहाचे औषध कमी करेल २०१२ मध्ये मी या कार्यास सुरुवात केली. मधुमेह याविषयी शास्त्र शुद्ध पद्धतीने लोकांना मार्गदर्शन केले. लोकांच्या प्रश्नांची सखोल चर्चा करून उत्तरे दिली. सर्वात शेवटी निरोगी आरोग्याच्या शुभेच्छा दिल्या पुरस्कारार्थींचे अभिनंदन केले. सदर कार्यक्रमासाठी मा. सत्यशील शेरकर (चेअरमन विघ्नहर सहकारी साखर कारखाना,) मा.सुधीर महाराज घोलप, मा. दत्ता घोलप, मा. अनिल शेठ तांबे अध्यक्ष ग्रामविकास मंडळ ओतूर, माननीय विशाल शेठ तांबे नगरसेवक , महानगरपालिका पुणे, मा. श्रीहरी तांबे (उपाध्यक्ष श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ, )मा. निलमताई तांबे (संचालिका ,विघ्नहर सहकारी साखर कारखाना, मा. वैभव शेठ तांबे (सचिव, श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ,) मा. राहुल शेठ काकडे अध्यक्ष, सुभाष विद्यामंदिर पिंपळवंडी, मा. धनंजय डुंबरे (संचालक, विघ्नहर सहकारी साखर कारखाना,) मा.प्रशांत डुंबरे (उपसरपंच ग्रामपंचायत ओतूर) मा श्री विशाल तांबे (माजी सभापती पंचायत समिती जुन्नर)मा. मयूरशेठ ढमाले (खजिनदार, श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ), मा. गंगाराम बुवा डुंबरे (माजी सरपंच ओतूर), मा. प्रभाकर करपे (मुख्य अभियंता जुन्नर नगरपरिषद,) मा. सचिन तांबे, मा. बाळासाहेब डुंबरे, मा. नेताजी आहेर साहेब, मा. प्रदीप गाढवे सर (सचिव ग्रामविकास मंडळ ओतूर,) मा. सुनंदा डुंबरे मॅडम (माजी शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती जुन्नर, )मा. बाळासाहेब ढमाले (माजी सदस्य ग्रामपंचायत ओतूर, )मा. जयप्रकाश डुंबरे, मा. संतोष तांबे (माजी संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती जुन्नर), मा. जी एम डुंबरे सर, मा. श्रीमती मनिषाताई ढमाले (माजी प्राचार्य, सावित्रीबाई फुले विद्यालय व सिताबाई तांबे ज्युनिअर कॉलेज ओतूर), माननीय डॉक्टर गणेश दामा प्राचार्य, शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ फार्मसी, मा.डॉक्टर गोविंद खरात प्राचार्य,शरदचंद्र पवार कॉलेज ऑफ इंजीनियरिंग डुंबरवाडी , सर्व पत्रकार बंधू,ज्येष्ठ नागरिक संघ ओतुर व मुक्ताई महिला बचत गट ओतूर तसेच त्यांचे पदाधिकारी, संस्थेच्या सर्व शाखांचे प्राचार्य, मुख्याध्यापक ,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी पालक व ग्रामस्थ या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माननीय श्री संजय देवकर सर यांनी केले तर मानपत्र वाचन श्री संतोष झावरे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन माननीय श्री माणिक बोराडे सर यांनी केले. कार्यक्रमाचा समारोप माऊलीचे पसायदान ने झाला.

## स्वप्नील अण्णा जाधव मित्रमंडळच्या वतीने आ.अमित गोरखे व सचिन साठे यांच्या सत्कार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उदगीर । सुनिल बस्वराज हावा**

उदगीर येथे कार्यक्रमानिमीन आलेले विधान परिषदचे नवनियुक्त.आ.अमित गोरखे व आण्णाभाऊ साठे यांच्या नातू सचिन साठे यांचा सत्कार स्वप्नील जाधव मित्रमंडळच्या वतीने उदगीर जळकोट विधानसभेचे इच्छुक उमेदवार व सामाजिक कार्यकर्त स्वप्निल अनिल जाधव यांनी केला.यावेळी देऊळवाडी ग्रामपंचायात चे सदस्य दत्ता( भाऊ) बाळासाहेब , बाळासाहेब जाधव, दादासाहेब देडे व असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## जुई धारणात ४ फूट पाणीसाठा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । शेख जफर**

भोकरदन तालुक्यातील दानापूर येथील जुई धरण या जुई धरणातून भोकरदन शहरासह वीस गावांना पाण्याचा पुरवठा करण्यात येतो या उन्हाळ्यामध्ये प्रत्येक गावांना त्रीव पाणीटंचाईचा सामना करावा लागला होता मात्र पावसाळा सुरू होऊन तीन महिने लोटले तरीही या परिसरामध्ये दमदार पाऊस झाला नसल्याने धरणामध्ये पाणीसाठाच नव्हता परंतु दिनांक १ सप्टेंबर रोजी मध्यरात्री पडलेल्या पावसामुळे जुई धरणामध्ये ४ फूट पाणी साठा आला आहे या पाण्यामुळे काही अंशी का होईना पाणीटंचाईचे सावट दूर होणार आहे गेल्या पंधरा दिवसाला पाणीपुरवठा होत असल्याने परिसरातील गावे हैराण होते मात्र पावसाळा सुरू होऊन तीन महिने उलटले तरीही धरणात थेंबही पाणी नसल्याने मोठा प्रश्न जनतेसमोर ठाकला होता मात्र १ सप्टेंबर रोजी मध्यरात्री झालेल्या जोरदार पावसाने जुई धरणामध्ये ४ फूट पाणीसाठा झाला आहे अजूनही पाणी येवा सुरुच आहे अजुन पाणी पतलित वाढ होण्याची मोठी शक्यता आहे यामुळे परिसरातून समाधान व्यक्त केला जात आहे. भोकरदन शहर दानापुर, देहेड, मुर्तड, पिम्पलगाव, कठोरा बाजार, दगड़वाड़ी, तलनी , वीरेगाव, भायडी, मालेगांव, कोलेगाव, वडशेड, वरुड, बभूलगाव, सीपोरा, वकडी ,कुकड़ी, कल्याणी आदि गवाना याच धरणतुन पानी पुरवठा होतो

## वाट्टेल ते सहन करील पण अपमान सहन करणार नाही : माजी.मंत्री हर्षवर्धन पाटील

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**



इंदापूरमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दत्तात्रय भरणे यांच्या उमेदवारीचे संकेत दिले,आणि त्यानंतर भाजपाचे नेते हर्षवर्धन पाटील तुतारी हाती घेणार अश्या चर्चा सुरु झाल्या. यानंतर हर्षवर्धन पाटलांची शरद पवारांसोबत जवळीक वाढल्याचं पहायला मिळालं.हर्षवर्धन पाटील आता शरद पवारांच्या गटात प्रवेश करतील हे जवळपास निश्चित मानल जात आहे.

गेल्या काही दिवसापासून हर्षवर्धन पाटील विमान चिन्ह,आणि अपक्ष उमेदवार म्हणून चर्चा होत्या.कारण इंदापूरच्या जागेबाबत महायुतीत तेढ निर्माण झाल्याचं चित्र आहे.त्यातचं अजित पवारांनी इंदापूरच्या जनसन्मान यात्रेत दत्तात्रय भरणे यांच्या उमेदवारीचे संकेत देत युतीत मिठाचा खडा टाकला.

पाटील इंदापूर तालुका विकास आघाडीतून उद्याची विधानसभा लढवतील अशा चर्चा असताना पुण्यात शरद पवार आणि हर्षवर्धन पाटलांमध्ये बंद दाराआड चर्चाही झाली.त्यानंतर शुक्रवारी ३० ऑगस्ट रोजी बावड्यातील जनसंवाद मेळाव्यात मला सर्वांचे फोन येत आहेत,त्याचा नीट अर्थ समजून घ्या.अद्याप मी कोणालाही होकार दिला नाही.असं हर्षवर्धन पाटलांनी म्हटलं.तर याच मेळाव्यात हर्षवर्धन पाटलांसमोर कार्यकर्त्यांनी रामकृष्णहरी वाजवा तुतारी असा नाराही दिला.त्यामुळे समरजित घाटगे यांच्या नंतर हर्षवर्धन पाटील पवारांच्या गटात सहभागी होतील हे जवळपास निश्चित मानलं जात आहे.

अजित पवार बोलले तो महायुतीतील धर्म नाही.जागावाटप झालं नसताना हा अधिकार महायुतीतील एका पक्षाला कसा काय दिला. असा प्रश्न ही हर्षवर्धन पाटलांनी उपस्थित केला आहे.हर्षवर्धन पाटलांनी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या प्रतिक्रियेवर टोकाचं वक्तव्य केल.मी कोणत्याही प्रकारची भूमिका घेतलेली नसताना या पद्धतीच्या भूमिका जर मांडायला लागला तर इंदापूर तालुक्यातील सामान्य माणसांना दुखवण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला? या गोष्टी चांगल्या नाहीत,हर्षवर्धन पाटील आयुष्यात सर्व काही सहन करेल पण अपमान सहन करणार नाही असं हर्षवर्धन पाटलांनी बावनकुळे यांना ठनकावून सांगितलं आहे.

## सोलापूर येथे राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सोलापूर । प्रतिनिधी**

२५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर त्या काळात राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा साजरा केला जातो त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा अंधत्व नियंत्रण समिती जिल्हा रुग्णालय सोलापूर यांच्या वतीने राष्ट्रीय नेत्रदान पंधरवडा कार्यक्रम माननीय जिल्हा शल्यचकित्सक डॉ सुहास माने सर यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

नेत्रदान हे काळाची गरज असून नेत्रदान चळवळ म्हणून उभी राहायला पाहिजे आपल्या मृत्यूनंतर नेत्रदान करून अंध व्यक्तीच्या प्रकाश निर्माण करू शकतो मृत्यूनंतर ही आपण नेत्ररूपाने आपण या जगात राहू शकतो असे मत मांडले. आणि सर्व नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प करून या राष्ट्रीय चळवळीत सहभाग घ्यावा असे आवाहन केले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती डॉक्टर नवीन जीवने, डॉ डॉक्टर नवनीत तोष्णीवाल, डॉ गणेश इंदुरकर, ज्येष्ठ कवी देवेंद्र औटी, मेट्रन बेले मॅडम होते. जिल्हा नेत्र शल्यचकित्सक डॉ नविन जीवणे यांनी नेत्रदामाबद्दल समज गैरसमज या विषयी माहिती दिली. डॉ नवनीत तोष्णीवाल यांनी नेत्रदानातील उपचार या विषयी माहिती दिली. डॉ गणेश इंदुरकर यांनी नेत्रदान चळवळ व अडचणी या विषयी माहिती दिली. त्याचबरोबर नेत्रदान विषयी पोस्टर प्रदर्शन भरवण्यात आले होते. आणि युवा क्रांती कला मंचाच्यावतीने नेत्रदान वर पथनाट्य सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ गणेश इंदुरकर सर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार जिल्हा नेत्र समूपदेशक विकास लिंगराज यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जानराव सिस्टर ओपिडी मधील स्टाफ गणेश सोनवणे, वर्षा निली, बसवराज खजूरगी, नदाफ मॅडम, रोटले मॅडम, पंकज कोलूर तर सर्व कर्मचारी आणि परिश्रम घेतले.

# शेतकऱ्यांच्या पोळा,गणपती व महालक्ष्मी सणावर अतिवृष्टीची कुऱ्हाड

## शिवसेना जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांच्याकडून नुकसानग्रस्त शेती पिकांची पाहणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मंठा । प्रतिनिधी**



शेतकऱ्यांच्या पोळा, गणपती व महालक्ष्मी सणावर अतिवृष्टीची कुऱ्हाड कोसळली असून शेतीपिकांसह अनेक घरांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या अतिवृष्टीने अनेकांचे संसार उघड्यावर पडले असून मंठा, परतूर, नेर - सेवली विधानसभा मतदारसंघ अतिवृष्टीग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए जे बोराडे यांनी केली आहे. आज सोमवार ता.२ रोजी मंठा तालुक्यातील हेलसवाडी, लिंबे वडगाव, पेवा यासह अनेक गावातील शेत शिवारातील नुकसान झालेल्या पिकांची तसेच पडझड झालेल्या घरांची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत बाजार समितीचे संचालक कल्याणराव खरात, बाबाराव राठोड, डॉ. दत्तात्रय काकडे, तुळशीराम कोहिरे, दासोपंत खरात यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती. हेलसवाडी येथे गाई व शेळ्या वाहून तर काही दगावल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. अनेक घरांमध्ये पाणी शिरून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे दिसून आले. हेलसवाडी येथील ट्रांसफार्मर पडल्यामुळे विज पुरवठा खंडित झाला होता. याबाबत श्री बोराडे यांनी विद्युत वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता श्री मठपती यांना संपर्क साधून युद्धपातळीवर काम करून वीजपुरवठा सुरळीत करावा अशा सूचना दिल्या. नदी काठावरील गावांना नुकसानीचा सर्वाधिक फटका बसला. शेतकऱ्यांचा सर्वात मोठा सण समजला जाणारा पोळा, गणपती व महालक्ष्मी सणाच्या तोंडावर ही नैसर्गिक आपत्ती ओढवली असल्यामुळे झालेल्या नुकसानी बाबत जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार यांना सूचना देऊन दोन्ही तालुक्यातील नुकसानीचे पंचनामे करण्यात वेळ न घालता शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत मिळवून द्यावी अशी मागणी केली.तसेच शिवसेनेचे एक शिष्टमंडळ लवकरच जिल्हाधिकार्यांना भेटून मंठा व परतुर तालुकासह नेर सेवली मतदारसंघ अतिवृष्टी म्हणून जाहीर करावा अशी मागणी करणार असल्याचे सांगितले. यावेळी अशोक खरात, राजेभाऊ खरात, सुरेश शेरे, इंद्रजीत खरात, नारायण गोरे, अशोक खारवणे, काशिनाथ खरात, तुकाराम बोंडारे, लालमिया पटेल, बळीराम वरणकर, रावसाहेब थोरात, जनार्दन वरणकर, भारत शिंदे, मुरलीधर थोरात, साहेबराव थोरात, उद्धव सोनुनकर, भारत सोनटक्के, जनार्दन सोनटक्के, कैलास थोरात, कान्होबा थोरात, ग्यानुजी शिरामे, रामदास पुणेकर, बंडू सोनुनकर, दीपक डांगे, कृष्णा वरणकर यांची उपस्थिती होती.

# भाविकांना लागली श्री क्षेत्र रांजणगाव महागणपतीच्या भाद्रपद द्वारयात्रेची आतुरता

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**

अष्टविनाकांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र रांजणगाव येथील महागणपतीची दरवर्षीप्रमाणे पारंपारीक धार्मिक भाद्रपद द्वारयात्रेला बुधवार दि ४ सप्टेंबर रोजी सुरुवात होणार असून या यात्रेसाठी देवस्थानच्या वतीने विविध भरगच्च धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन देखील करण्यात आले आहे. या द्वारयात्रेसाठी राज्यासह देशभरातून अनेक भाविक दर्शनासाठी येत असतात.भाविकांच्या मनात याकाळात गजानना सारा भार तुझ्या हाती तूच कर्ता आणि करविता सदैव राहो ओठांवरती तुझेच रे गुण गाण मोरया मोरया चला जावू यात्रेसी महापुण्य आहे मनी इच्छिलेले महागणपती मोरया देत आहे अशी भावना असते. नवसाला पावणारा महागणपती म्हणजेच श्री क्षेत्र रांजणगावचा महागणपती, अशी भाविकांची श्रद्धा आहे. अष्टविनाकांपैकी एक असलेल्या रांजणगाव येथील महागणपतीच्या द्वार यात्रेचा उत्सव येत्या बुधवार (दि. ०४/०९/२०२४) रोजी सुरुवात होणार असून मंगळवार (दि.१०/०९/२०२४) समाप्त होणार आहे. या यात्रेदरम्यान महागणपतीच्या मूर्तीची देवाची पालखी चार दिवसांत महागणपतीच्या बहिणींना आणण्यासाठी जात असते. पहिल्या दिवशी पूर्वद्वार कडे असलेल्या करडे गावातील मांजराई देवीकडे पालखीचे प्रस्थान होत असते. पहिल्या दिवशी पालखीचे मानकरी हे पाचुंदकर आळी असतात. दुसऱ्या दिवशी दक्षिण द्वार असलेल्या निमगाव म्हाळुंगी येथील आसराई (शिरसाई) देवीकडे पालखीचे प्रस्थान होते. यावेळी पालखीचे मानकरी माळी आळी असतात, तर तिसऱ्या दिवशी पश्चिम द्वार असलेल्या गणेगाव खालसा येथील ओझराई देवीकडे पालखीचे प्रस्थान होते. यावेळी पालखीचे मानकरी लांडे आळी हे असतात. तर चौथ्या दिवशी उत्तरद्वार असलेल्या ढोक सांगवी येथील मुक्ताई देवीकडे पालखीचे प्रस्थान होत असते. यादिवशी पालखीचा मान शेळके आळी यांचा असतो. या चार दिवसांत महागणपीच्या मूर्तीस स्पर्श करून दर्शन भाविकांना घेता येत असते. त्यानंतर इतर दिवशी देखिल विविध कार्यक्रमांचे रांजणगाव गणपती देवस्थान ट्रस्ट यांनी आयोजन केलेले आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी विविध सोई सुविधा देखील उपलब्ध करण्यात आल्या असून यात महिलांसाठी विशेष हिरकणी कक्ष देखिल उभारण्यात आलेले आहेत. तसेच सुरक्षेच्या दृष्टिकोनातून पोलिसांचा देखील मोठा फौज फाटा तैनात करण्यात येणार आहे, तसेच भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, तसेच वाहन पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे. यात समस्त ग्रामस्थ,देवस्थान ट्रस्ट,ग्रामपंचायत, महसूल विभाग, पोलीस प्रशासन, आरोग्य विभाग आणि प्रशासन यंत्रणा सज्ज झालेले आहेत. यात्रा काळात भाविकांनी मोठ्या संख्येने महागणपतीच्या दर्शनाला यावे असे आवाहन देखील देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले असल्याची माहिती विद्यमान अध्यक्षा स्वाती पाचुंदकर व सचिव तुषार पाचुंदकर यांनी दिली आहे.

तसेच देशभरातून येणाऱ्या भाविकांची योग्यरित्या सोई सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत. देवस्थान ट्रस्टचे मुख्य विश्वस्त ओमकार देव, अध्यक्षा स्वाती पाचुंदकर, उपाध्यक्ष संदीप दौंडकर, सचिव तुषार पाचुंदकर, खजिनदार विजय देव यांनी छान तयारी केली आहे.



# शेतकऱ्यांनी पीक नुकसानीची तक्रार ७२ तासांच्या आत करावी – जिल्हाधिकारी अभिजीत राऊत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

नांदेड जिल्ह्यामध्ये मागील दोन दिवसापासून अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. अशा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी विमा कंपनीस ७२ तासाच्या आत नुकसानीची पूर्व सूचना कळवावी असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे यांनी केले आहे.

नांदेड जिल्ह्यामध्ये मागील दोन ते तीन दिवसापासून अतिवृष्टी होत आहे. त्यामुळे नदी नाल्यांना पूर येऊन पुराचे पाणी शेतात शिरून पिके जलमय होऊन, पडलेल्या पावसामुळे पाण्याची पातळी वाढून किंवा ओसंडून वाहणारी विहीर इत्यादी कारणांमुळे शेती पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत आहे. वरील




नुकसानीची भरपाई ही पीक विमा योजनेतील स्थानिक नैसर्गिक आपत्ती या घटकाअंतर्गत देण्यात येते.

वरील कारणांमुळे नुकसान झाल्यास होणारे अधिसूचित पिकांचे नुकसान हे वैयक्तिक स्तरावर पंचनामे करून निश्चित करण्यात येते. त्यासाठी शेतकरी बांधवांनी ७२ तासाच्या आत विमा कंपनीस पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. नुकसानग्रस्त विमाधारक शेतकरी यांनी गुगल प्ले स्टोअर वरून क्रॉप इन्शुरन्स हे प डाऊनलोड करून त्यामध्ये आपल्या नुकसानीची माहिती भरावी किंवा टोल फ्री क्रमांक १४४४७ याद्वारे विमा कंपनीस नुकसानीची पूर्वसूचना द्यावी. पूर्वसूचना दिल्यानंतर विमा कंपनी मार्फत किंवा केंद्र शासनामार्फत प्राप्त झालेला डॉकेट आयडी सांभाळून ठेवावा. क्रॉप इन्शुरन्स प मध्ये पूर्वसूचना देताना अतिवृष्टी, जास्तीचा पाऊस या कारणांचीच निवड करावयाची आहे, इतर कारणे नमूद करू नये.

काही तांत्रिक अडचणीमुळे शेतकरी वरील माध्यमांद्वारे विमा कंपनीस पूर्व सूचना देऊ न शकल्यास तालुका प्रतिनिधी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी किंवा संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयास किंवा आपल्या गावातील संबंधित कृषि सहाय्यक, तलाठी किंवा ग्रामसेवक यांच्याकडे ऑफलाईन अर्ज सादर करावा, असेही कृषि विभागाने कळविले आहे.

# जिल्हा परिषद आष्टा शाळेतील मुलींचा व मुलांचा खो-खो संघ आष्टी तालुक्यात प्रथम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी तालुक्यात आष्टी तालुकस्तरीय संपन्न झालेल्या १९ वर्षाखालील व १४ वर्षाखालील मुलांच्या व मुलींच्या खो-खो स्पर्धेत जिल्हा परिषद माध्यमिक आष्टा ह.ना.या शाळेतील दोन्ही संघाने आष्टी तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला.या संघांना शाळेतील शिक्षक उमेश झांबरे सर यांनी मुख्य मार्गदर्शन केले.शाळेचे मुख्याध्यापक मच्छिंद्रनाथ जगताप सर व खो खो संघाचे मुख्य मार्गदर्शक उमेद झांबरे सर व शाळेतील सर्व शिक्षकांचे गटशिक्षणाधिकारी सुधाकर यादव साहेब,ज्येष्ठ शिक्षण विस्तार धिकारी मनोरंजन धस साहेब,अर्जुन गुंड साहेब,पतसंस्थेचे चेअरमन मारुती पठाडे,जिल्हा परिषद सदस्य पती अमरराजे निंबाळकरयांनी अभिनंदन केले. या यशाबद्दल,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष,संजय



पठाडे,उपाध्यक्ष साईनाथ गळगटे व सर्व सदस्य,आष्टा गावच्या सरपंच दैवशाला गणेश माळवे, उपसरपंच रूपाली वैभव पठाडे ल सर्व सदस्य इत्यादींनी शाळेत येउन शाळेतील मुलींचे व मुलाचे व शाळेतील शिक्षक धर्मराज शिंदे,रघुनाथ मुटकुळे,नामदेव भिसे,श्रीरंग खोकले,भागवत राजेंद्र,धुमाळ मधुकर,बांगर सुभाष ,बळे लालासाहेब,बापू शिंदे,वाळके सोमनाथ,पवार तुषार,अष्टेकर दिगंबर,अनिता चव्हाण,गवळी द्रौपदी,जाधव सुषमा,नाईकनवरे मनीषा,सुराणा स्वरूपचंद सेवक,काळे शोभा सेवक यांचे गावातील सर्व मान्यवरांनी विजय संघातील खेळाडूंचे त्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत केले यामध्ये १९ वर्षाखालील मुलींच्या संघाचे नेतृत्व साक्षी पठाडे हीने केले तनुजा पठाडे,पंकजा आंधळे,अक्षरा गळगटे,समीक्षा रणसिंग,प्रांजल रणसिंग,विद्या आंधळे,अनुराधा गोपाळघरे, स्वप्नाली भवर,अनुष्का गर्जे,ज्ञानेश्वरी गोपाळघरे,या मुलींनी विजयात वाटा उचलला तर १४ वर्षाखालील मुलांच्या खो-खो संघाचे नेतृत्व ईश्वर घोडके यांनी केले,या संघात आदित्य खंदारे,राज आंधळे,ऋतिक घोडेस्वार,विराज आंधळे,ओम आंधळे,तेजस शिंदे,समर्थ शिंदे, महेश माळवे,आयुष राऊत,गौरव आंधळे,अनुज गीते,प्रतिक घोडेस्वार यांचा विजयात महत्वाचा वाटा होता.सहभाग नोंदवला आष्टा शाळेतील विजयी संघातील मुलांचे सर्वत्र कौतुक अभिनंदन होत आहे.

# वंचित बहुजन आघाडी प्रभाग क्रमांक-४ कडून विविध मागण्यांसाठी सहाय्यक आयुक्तांना निवेदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली । संतोष कदम**

वाघोली गावातील परिसरात विविध समस्या बाबत वंचित बहुजन आघाडी प्रभाग क्रमांक चार ठोस भुमिका बजावत आहे. वंचित बहुजन आघाडी समूह उत्कृष्ट रित्या काम करत आहे.

दिवसेंदिवस विविध समस्यांचा सामना वाघोलीकरांना करावा लागत आहे. वाघेश्वर नगर, गोरे वस्ती रोड तसेच वाघोली गावातील ड्रेनेज लाईन ,पथ दिवे सार्वजनिक शौचालयाची साफसफाई , विविध ठिकाणी कचरा व्यवस्थापनाअभावी



कचऱ्याची दुर्गंधी पसरत आहे , सांडपाण्याचा निचरा होत नसल्याने डासांचे प्रमाण वाढले आहे.त्याचाच परिणाम मानवी आरोग्यावर होत आहे व साथीचे आजार पसरत आहेत.इत्यादी अनेक समस्या बद्दल श्री.संजय पोळ (सहाय्यक आयुक्त पुणे नगर रोड वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालय पुणे ) यांना निवेदन देण्यात आले.

पुणे नगरपालिकेत वाघोली गावाचा समावेश झाल्यापासून बऱ्याच योजना आणि सुधारणा वाघोलीकरण पर्यंत पोहोचल्या नाहीत. या आधी ग्रामपंचायत स्तरावर विविध प्रश्न अन् समस्या तात्काळ सुटत होत्या असं जनसमान्यातून बोललं जात आहे.

वंचित बहुजन आघाडी प्रभाग क्रमांक चार चे अध्यक्ष संदीप भाऊ मोरे , पदाधिकारी श्री. आदित्य कांबळे, प्रदीप चव्हाण , मनोज बिहाडे, विशाल आदमाने यांनी निवेदाद्वारे सहाय्यक आयुक्तांना मागण्या पूर्ण नाही झाल्या तर आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे. उपोषणाला बसण्याची गरज नाही, आपल्या मागण्या लवकरच पूर्ण होतील असे आश्वासन सहाय्यक आयुक्तांनी वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकाऱ्यांना दिले आहे.



आष्टी:बैलपोळा सणाच्या निमित्ताने माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी सपत्नीक बैलांची विधिवत पूजा करत त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य भरवत बळीराजाला पौळ्याच्या शुभेच्छा दिल्या.. (लोकनेता न्यूज नेटवर्क आष्टी)



आष्टी तालुक्यातील बैलपोळा मोठ्या उत्साहात संपन्न. बैलपोळ्या ला घरोघरी पुरणपोळी चा नैव्यद्य घरच्या जनावरांना दिला जातो,त्यांची दिवा सोने नाणे आणि गोड खाऊ घालून पूजा केली जाते,ताट वाजून पाणी शिंपडून बैलांचं लग्न लावलं जात.गावात बैलांना स्वछ धुवून सजवून हनुमान मंदिरासमोर मिरवलं जात.सर्व देव दैवताना नारळ फोडून नैव्यद्य दिला जातो घरात पूरन पोळीचा सण करून पोळा सण साजरा केला जातो.डॉ संतोष शेळके आणि नितीन सायकर,सचिन सायकर,बाळु भोपळे,यांच्या घरी बैलपोळा साजरा करताना त्यांचा परिवारा सोबत पुरोगामी पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब साबळे आणि कुटुंब परिवार दिसत आहे (लोकनेता न्यूज नेटवर्क आष्टी)

# सिंदखेडराजा उपविभागीय अधिकारी यांनी उपविभागीय कार्यालयांमध्ये केले बैलाचे पुजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

कृषीप्रधान संस्कृतीमधला महत्त्वाचा उत्सव बैलपोळा,बैलपोळा वर्षभर बळीराजाच्या खांद्याला खांदा लावून काबाडकष्ट करणाऱ्या इमानी अशा बैलांप्रती सद्भावना व्यक्त करण्याचा दिवस उपविभागीय अधिकारी कार्यालयामध्ये साजरा करण्यात आला.यावेळी उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांनी बैलांची पूजन व स्वागत केले.

कष्टाशिवाय मातीला बैलाशिवाय शेतीला अन् बळीराजाशिवाय देशाच्या प्रगतीला पर्याय नाही. शेतकरी राजा पोळ्याच्या सणा निमित्त शेतात वर्षभर काबाडकष्ट कष्ट करणाऱ्या ( गुण्या -गोविंदया ) आवडत्या बैलांना गरम पाण्याने अंघोळ घालून , बाशिंग झुलांनी सजवून , त्यांची वाजतगाजत मिरवणूक काढून , प्रेमाने



पुजा - अर्चा करून , त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करीत असतात. उपविभागीय अधिकारी कार्यालय मध्ये प्रा. संजय खडसे यांनी सुद्धा बैल पोळ्याचे पूजन केले . यावेळी सिदखेडराजाचे तहसीलदार श्री प्रवीण धानोरकर हे सुद्धा येथील बैलाचे पुजन व स्वागत केले. व तसेच उपविभागीय अधिकारी प्रा.संजय खडसे यांनी सर्व शेतकरी बांधवांना बैल पोळा सणाच्या शुभेच्छा दिल्या.

# अतिवृष्टीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी ६० हजार रुपये अनुदान द्या-एकनाथ दादा पवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

लोहा व कंधार तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करुन



अतिवृष्टीचे शासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी ६० हजार रुपये नुकसानभरपाई म्हणून अनुदान द्यावे अशी मागणी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार यांनी केली आहे.

पुढे शिवसेनेचे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार यांनी असे नमूद केले की,लोहा व कंधार तालुक्यात मागील तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळून शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतामध्ये पाणी मोठ्या प्रमाणात शिरले आहे.

तसेच नदी,नाले काठांचे शेत व पिक वाहुन गेले आहे. अगोदर शेतकरी बांधव आर्थिक असताना आता या अतिवृष्टीमुळे दुष्काळात तेरावा महिना म्हटल्याप्रमाणे झाले आहे. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन, कापुस,मुग, उडीद आदी खरीप पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे तेव्हा शासनाने लोहा व -कंधार तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा तसेच पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी ६० हजार रुपये नुकसानभरपाई म्हणून अनुदान द्यावे अशी मागणी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार यांनी केली आहे.



शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजी यांनी मुळगाव सिंधी येथे पोळा सण साजरा केला.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट संपर्क कार्यालयाचे नरसी येथे लवकरच शुभारंभ -सय्यद चॉदपाशा नरसीकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे संपर्क कार्यालय लवकरच नरसी मध्ये सुरुवात करण्यात येईल.असे सय्यद चाँदपाशा नरसीकर यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले आहे.काल मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे युवक प्रदेश अध्यक्ष मा. महेबुब भाई शेख यांची भेट घेउन सय्यद चाँद पाशा नरसीकर यांनी नरसी येथे युवक राष्ट्रवादी काँग्रेस च्या युवा कार्यकर्त्यासाठी संपर्क कार्यालयाची मागणी केली व त्यांच्या मागणीला मान देऊन महेबुब भाई शेख यांनी त्वरीत मान्य करुन त्यांना लवकरच संपर्क कार्यालयाचे शुभांरभ करण्यात येईल असे आश्वासन महेबुब भाई शेख यांनी सय्यद चाँदपाशा नरसीकर यांना दिले आहे.



हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904